नियमित दिवाणी दावा क्र.३५४/२०२४
दिनकर वि. शामा वगैरे
CNR No.MHOS120005312024

| | |
|---|---|
| MHOS120005312024 | नियमित दिवाणी दावा क्र.३५४/२०२४<br>दिनकर वि. शामा वगैरे<br>CNR No.MHOS120005312024 |

## निशाणी क्र.३६ वरील आदेश

## (पारीत दिनांक २१ ऑगस्ट,२०२६)

प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०९/०७/२०२६ रोजी त्याचेविरुध्द पुरावा बंदचा पारीत केलेला आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीचे कथन की, तो वयोवृध्द असल्याने व त्याचा मुलगा कामधंदयासाठी बाहेरगावी राहत असल्याने तो मुलाकडे गेला असल्याने त्याला न्यायालयात येवून त्याचा पुरावा वेळेत नोंदवता आला नाही व त्याचे गैरहजेरीत सदरचा आदेश पारीत झाला आहे, त्यामुळे तो रद्द करण्यात यावा व पुरावा देण्याची संधी त्यास देण्यात यावी.

२. वादीने म्हणणे देवून अर्जातील कारण खोटे आहे, प्रतिवादी न्यायालयाचे आवारात असूनही उलटतपासास आला नाही, प्रतिवादी प्रकरण चालविण्यास टाळाटाळ करतो त्यामुळे अर्ज नामंजूर करावा व मंजूर करावयाचा झाल्यास खर्चाबाबत आदेश पारीत करावा अशी विनंती केली आहे.

३. मी दाव्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दावा मालकी हक्काचा जाहीरनामा, निरंतर ताकिद आदेश व प्रतिवादी क्र.१,२ ने प्रतिवादी क्र.३ चे लाभात करून दिलेले खरेदीखत रद्द करून मागण्यासाठी केला आहे. दावा युक्तीवादासाठी असताना हा अर्ज दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीला पुरावा नोंदवण्याची संधी देणे

नैसर्गिक न्यायतत्वांनुसार गरजेचे आहे. त्यामुळे खर्चाचे आदेशावर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज रक्कम रुपये ३००/- खर्चाचे आदेशावर मंजूर करण्यात येत आहे व प्रतिवादी क्र.१ विरुध्द पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादीस देण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात पारित व घोषीत करण्यात आला.)

PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.08.21 13:20:01 +0530

**दिनांकः- २१ ऑगस्ट,२०२६** **(श्रीमती पी. एस. जाधव)**

**ठिकाणः- भूम** **२रे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर,**

**भूम.**

नियमित दिवाणी दावा क्र.३५४/२०२४
दिनकर वि. शामा वगैरे
CNR No.MHOS120005312024

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. D. B. Nikam,<br>Stenographer Gr-II |
| Court | --- | 2nd Jt. Civil Judge Sr. Dn.,Bhoom |
| Date | --- | 21/08/2026 |
| Order signed by the Presiding officer on | –- | 21/08/2026 |
| Order uploaded on | – | 21/08/2026 |